जिल्हा निवड समिती जालना जिल्हाधिकारी कार्यालय जालना

नगरविकास शाखा

जाहिरात क्रमांक -1/2016/जिनी/डेस्क-1/एमयुएन/कावि-546 दिनांक 27/12/2016

नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गातील (श्रेणी-क) गट क रिक्त पदांची व नगर परिषद / नगर पंचायतीच्या गट क व ड पदांची सरळसेवेने पदभरती 2016

जिल्हाधिकारी कार्यालय जालना (नगर विकास शाखा) यांच्या आस्थापनेवरील गट क व ड तसेच जिल्हातील नगर परिषद / नगर पंचायत मधील खालील दर्शविलेल्या गट क व ड संवर्गातील रिक्त पदांची सरळ सेवेने भरती करावयाची आहे. या करीता ऑनलाईन पध्दतीने पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. विस्तृत जाहिरातीचा मसुदा तसेच अटी व शर्ती जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या नोटीस बोर्ड वर आणि जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या WWW.Jalna.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज संकेत स्थळावर दिनांक 30/12/2016 ते दिनांक 11/01/2017 पर्यंत सायंकाळी 05-45 वाजेपर्यंत भरावेत.

www.nmk.co.in

उपलब्ध पदसंख्या व आरक्षणानुसार भरावयाच्या पदांचा पदनिहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील संवर्गातील पद भरती

01) महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा नगर अभियंता / पर्यवेक्षक (स्थापत्य) (श्रेणी-क)

(वेतन बॅन्ड 9300 - 34800 ग्रेड पे 4200)

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| अनु जमाती | 01 | 00 | 01 |
| विजा/जमाती अ/ब/क/ड | 01 | 00 | 01 |
| इमाव | 01 | 00 | 01 |
| खुला | 05 | 02 | 03 |
| एकूण | 09 | 02 | 07 |

2)महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा नगर अभियंता/पर्यवेक्षक (विद्युत) (श्रेणी-क)

(वेतन बँन्ड 9300 - 34800 ग्रेड पे 4200)

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| अनु जमाती | 01 | 00 | 01 |
| खुला | 02 | 01 | 01 |
| एकूण | 04 | 01 | 03 |

3)महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा नगर अभियंता/पर्यवेक्षक (संगणक) (श्रेणी-क)

(वेतन बँन्ड 9300-34800 ग्रेड पे 4200)

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| अनु जमाती | 01 | 00 | 01 |
| खुला | 02 | 01 | 01 |
| एकूण | 04 | 01 | 03 |

4) महाराष्ट्र नगरपरिषद पाणीपुरवठा, मलनिस्सारण व स्वच्छता पर्यवेक्षक अभियांत्रिकी सेवा (श्रेणी-क)

(वेतन बँन्ड 9300 - 34800 ग्रेड पे 4200)

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| अनु जमाती | 01 | 00 | 01 |
| खुला | 02 | 01 | 01 |
| एकूण | 04 | 01 | 03 |

(5)महाराष्ट्र नगरपरिषद लेखापरिक्षण व लेखा सेवा सहायक लेखा पर्यवेक्षक/सहायक लेखापाल (श्रेणी-क)

(वेतन बँन्ड 9300 - 34800 ग्रेड पे 4200)

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| अनु जमाती | 01 | 00 | 01 |
| एकूण | 02 | 00 | 02 |

www.nmk.co.in

(6)महाराष्ट्र नगरपरिषद अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक सेवा (श्रेणी - क 2) +

(वेतन बॅन्ड 5200- 20200 ग्रेड पे 2800)

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| अनु जमाती | 01 | 00 | 01 |
| विजा/जमाती अ/ब/क/ड | 01 | 00 | 01 |
| खुला | 03 | 01 | 02 |
| एकूण | 06 | 01 | 05 |

(7) महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारण व प्रशासकीय सेवा श्रेणी क- 2

(वेतन बॅन्ड 5200-20200 ग्रेडपे 2800)

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| विजा/जमाती अ/ब/क/ड | 01 | 00 | 01 |
| इ.मा.व. | 02 | 01 | 01 |
| एकूण | 03 | 01 | 02 |

www.nmk.co.in

## जालना जिल्हयातील नगरपालीका व नगरपंचायती आस्थापनेवरील पद भरती

1 पदाचे नावः लघुटंकलेखक वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेड पे 2400 नगरपालीका जालना रिक्त पदे 02

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| खुला | 01 | 00 | 01 |
| एकूण | 02 | 00 | 02 |

2 लिपीक टंकलेखक (श्रेणी-क) पदसंख्या 04 (वेतन बॅन्ड 5200 - 20200 ग्रेड पे 1900).

नगर परिषद भोकरदन रिक्त पदे 04

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| अनु जमाती | 01 | 00 | 01 |
| विजा/जमाती अ/ब/क/ड | 01 | 00 | 01 |
| खुला | 01 | 00 | 01 |
| एकूण | 04 | 00 | 04 |

3. पदाचे नाव: स्वच्छता निरिक्षक वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेड पे 2400

नगरपरिषद जालना रिक्त पदे 08 व नगर परिषद परतूर रिक्त पद 01

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| अनु जमाती | 01 | 00 | 01 |
| इमाव | 01 | 00 | 01 |
| खुला | 06 | 02 | 04 |
| एकूण | 09 | 02 | 06 |

4. पदाचे नाव: वाहनचालक कम ऑपरेटर 5200-20200 ग्रेड पे 1900

नगर परिषद जालना रिक्त पदे 05 नगर परिषद परतूर रिक्त पदे 01,
नगर परिषद भोकरदन रिक्त पदे 01

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 01 | 00 | 01 |
| अनु जमाती | 01 | 00 | 01 |
| खुला | 05 | 00 | 05 |
| एकूण | 07 | 00 | 07 |

www.nmk.co.in

5) पदाचे नाव सहायक उद्यान पर्यवेक्षक वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेड पे 2400

नगरपरिषद जालना रिक्त पदे 01 नगर परिषद अंबड रिक्त पदे 01 नगर परिषद परतूर रिक्त पदे 01

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| खुला | 03 | 00 | 03 |
| एकूण | 03 | 00 | 03 |

6.पदाचे नाव: आरोग्य सहायक / नर्स वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेड पे 2400

नगरपरिषद जालना रिक्त पदे 01 नगर परिषद भोकरदन रिक्त पदे 01

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| खुला | 02 | 00 | 02 |
| एकूण | 02 | 00 | 02 |

7. पदाचे नाव गाळणी चालक/प्रयोगशाळा सहाय्यक वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेड पे 1900
नगरपरिषद जालना रिक्त पदे 01, नगर परिषद परतुर रिक्त पदे 01, नगर परिषद भोकरदन रिक्त पदे 01

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| खुला | 03 | 00 | 03 |
| एकूण | 03 | 00 | 03 |

8) पंप ऑपरेटर (श्रेणी-क) ( वेतन बॅन्ड 5200 -20200 ग्रेड पे 1900)नगर परिषद अंबड रिक्त पदे 01

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जमाती | 01 | 00 | 01 |
| एकूण | 01 | 00 | 01 |

9) पदाचे नाव तारतंत्री वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेड पे 1900
नगर परिषद परतुर 01 पद व नगर परिषद भोकरदन 01 पद

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदांची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| खुला | 02 | 00 | 02 |
| एकूण | 02 | 00 | 02 |

10) पदाचे नाव फायरमन (वर्ग-4 ) वेतन श्रेणी 5200-20200 ग्रेड पे 1800
नगर परिषद जालना रिक्त पदे 07 व नगर परिषद भोकरदन रिक्त पदे 04

| जात प्रवर्ग | भरण्यात येणा-या रिक्त पदाची संख्या | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| अनु जाती | 03 | 01 | 02 |
| अनु जमाती | 02 | 00 | 02 |
| इमाव | 01 | 00 | 01 |
| खुला | 05 | 01 | 04 |
| एकूण | 11 | 02 | 09 |

टिप:- 1) अतिरिक्त संवर्ग, आंतर विभागीय समायोजन विभागीय बदली व इतर विभागातील पदांचा आढावा, तसेच नगर पंचायतीची मंजूर पदसंख्येचा आढावा इत्यादी कारणामुळे (पदसंख्येत कमी / अधिक होणे) आरक्षण / समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

2) नियुक्ती देण्याच्या नियमात, पदसंख्येत / आरक्षणात बदल करणे, रदद् करणे याबाबतचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी जालना यांना राहतील.

3) लेखी परिक्षेतील गुणवत्ते नुसार प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल व गुणवत्ता यादीमधुन नगरपंचायतीची पदे आरक्षणानुसार भरण्यात येतील.

www.nmk.co.in

4) उमेदवारांनी प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज करावा,व स्वतंत्र अर्जाकरिता वेगळे शुल्क भरणे अनिवार्य राहील.

## परिक्षेचे स्वरुप

सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक प्रानिम-1214/प्र.क्र. 43/14/13-अ दिनांक 5 जुन 2014 व दुसरे शासन निर्णय क्रमांक प्रानिम-1215/प्र.क्र 109/15/13-अ दिनांक 5 ऑक्टोबर 2015 मधील तरतुदीनुरुप

5) वाहन चालक / ऑपरेटर, फायरमन, या पदाकरिता दिनांक 22/01/2017 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 12.30 वाजेपर्यन्त 100 गुणाची लेखी परिक्षा घेण्यात येईल, ज्यामध्ये माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रम असेल. मराठी इंग्रजी सामान्य ज्ञान आणि बुध्दीमत्ता चाचणी प्रत्येकी 25 गुणाचे प्रश्न असतील. तसेच सदर पदाकरिता 60 गुणाची व्यवसायीक चाचणी व 40 गुणाची शारीरीक चाचणी घेण्यात येईल.

6) लिपीक टंकलेखक, तारतंत्री, पंपचालक या पदाकरिता 200 गुणाची लेखी परिक्षा दि. 22/01/2017 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 13.00 या वेळेत घेण्यात येईल ज्यामध्ये माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रम असेल. मराठी इंग्रजी सामान्य ज्ञान आणि बुध्दीमत्ता चाचणी प्रत्येकी 50 गुणाचे प्रश्न असतील.

7) अभियांत्रिकी सेवा स्थापत्य, विद्युत, संगणक, पाणी पुरवठा व मलनिःस्सारण स्वच्छता, लेखा परिक्षण व लेखा सेवा, अग्नीशमन सेवा, कर निर्धारक व प्रशासकीय सेवा, लघुटंकलेखक, गाळणी चालक / प्रयोग शाळा सहाय्यक, आरोग्य सहाय्यक, सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदाकरिता 200 गुणाची लेखी परिक्षा दिनांक 05.02.2017 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 13.00 वाजता या वेळेत घेण्यात येईल. ज्यामध्ये पदवी स्तरावरील अभ्यासक्रम असेल. मराठी इंग्रजी सामान्य ज्ञान आणि बुध्दीमत्ता चाचणी प्रत्येकी 50 गुणाचे प्रश्न असतील.

| |
|---|
| चलनाव्दारे परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन दिनांक 13.01.2017 पर्यंत राहील व परिपूर्ण ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक 11.01.2017 रोजी सायं. 05.45 पर्यंत राहील. |

अर्जदाराने **Online** अर्ज भरताना वस्तुनिष्ठ व अचूक माहिती भरावी तसेच **Online** अर्जासोबत कोणतेही प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे जोडण्यात (अपलोड) करण्यात येवू नयेत. **Online** भरलेल्या माहितीच्या आधारे (मुळ कागदपत्रे तपासणीच्या आधीन राहून) उमेदवारांची गुणवत्ता यादी करण्यात येईल. त्याचप्रमाणे **Online** अर्ज करतांना आपल्या सर्व शैक्षणिक व इतर बाबींची पुर्ण माहिती नमूद करावी.

## शैक्षणिक अर्हता व पात्रता :-

जिल्हाधिकारी कार्यालयातील आस्थापनेवरील अ.क्र. 01 ते 07 पदाची शैक्षणीक अर्हता जाहिरातीतील पदासाठी खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दिनांक 27.12.2016 रोजी धारण करणे आवश्यक आहे.

www.nmk.co.in

| | | |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क) | 1) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी (B.E.Civil ) किंवा पदविका (स्थापत्य) (D.E.Civil ) समकक्ष असणे आवश्यक आहे.<br>2) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.<br>3) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |
| 2 | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (विद्युत) (श्रेणी-क) | 1) मान्यताप्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी (B.E.Electrical ) किंवा पदविका (विद्युत) (D.E.Electrical ) समकक्ष असणे आवश्यक आहे.<br>2) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.<br>3) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |
| 3 | महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (संगणक)(श्रेणीक) | 1) मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकी पदवी (B.E.Computer ) किंवा पदविका (संगणक) (D.E.computer ) समकक्ष असणे आवश्यक आहे.<br>2) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.<br>3) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |
| 4 | महाराष्ट्र नगरपरिषद पाणीपुरवठा, मलनिस्सारण व स्वच्छताअभियांत्रिकी सेवा (श्रेणी-क) | 1) मान्यताप्राप्त विद्यापिठाची यांत्रिकी / पर्यावरण अभियांत्रिकी पदवी (B.E.Mechanical/Environmental ) किंवा पदविका (यांत्रिकी / पर्यावरण) (D.E.Mechanical/Environmental ) समकक्ष असणे आवश्यक आहे.<br>2) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.<br>3) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |
| 5 | महाराष्ट्र नगरपरिषद लेखापरिक्षण व लेखा सेवा (श्रेणी-क) | 1) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवी आणि Member of Institution of Cost and Works Accounts किंवा सनदी लेखापाल (Chartered Accountant).B.co Talley<br>2) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.<br>3) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |
| 6 | महाराष्ट्र नगरपरिषद अग्निशमन सेवा (श्रेणी-क 2 ) | 1) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>2) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपुर येथील उपस्थानक अधिकारी अभ्यासक्रम (Sub Officers Course) उत्तीर्ण असणे आवश्यक किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा "उपस्थानक अधिकारी आणी अग्नि प्रतिबंधक अधिकारी" हा परिपुर्ण पाठ्यक्रम उत्तीर्ण होणारे उमेदवार अग्निशमन सेवेतील अधिकारी पदावर नियुक्त होण्यास पात्र आहे.<br>3) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>4) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील. |
| 7 | महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारक व प्रशासकीय सेवा श्रेणी क-2 | 1)शासनमान्य विघ्यापीठाची कोणत्याही शाखेचा पदविधर असणे आवश्यक<br>2) खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक<br>3) समाजकार्य (socil work)<br>4) लोकाभिमुख प्रशासन (Public Administrion)<br>5)Town & Contry Planning<br>6)कायदा (Law)<br>7) राज्यशास्त्र (Poltical scince)<br>8) MBA<br>9) वाणीज्य Commerce) |

www.nmk.co.in

| | | |
|---|---|---|
| | | 10) कोणत्याही शाखेची अभियांत्रीकी पदवी<br>11) मराठी भाषेचे ज्ञान असेण आवश्यक राहील<br>12) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |

नगरपरिषद व नगरपंचायत आस्थापनेवरील पदाची शैक्षणीक व शारिरीक अर्हता (1 ते 10 पदासांठी)

| | | |
|---|---|---|
| 1 | लघुटंकलेखक | शासन मान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेचा पदविधर व लघुलेखनाचे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र(महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) असने आवश्यक आहे.<br>90 श.प्र.मि.मराठी 120 श.प्र.मि.इंग्रजी<br>टंकलेखनाचे शासन मान्य संस्थेचे प्रमाणपत्र(महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) असने आवश्यक आहे.<br>30 श.प्र.मि.मराठी 40 श.प्र.मि.इंग्रजी<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र(महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) असने आवश्यक आहे.<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.नगर परिषद सेवेत आल्यानंतर संचालनालयाने विहीत केलेली विभागीयपरीक्षा उतीर्ण होणे आवश्यक अशी विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानीक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक. |
| 02 | लिपीक टंकलेखक (श्रेणी-क) | किमान उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यंक.पदवीधारकांना प्राधन्यं शासनमान्यं औद्योगीक संस्थेचे डेटा एन्ट्री ऑपरेटरचे उत्तीर्ण प्रमाणपत्र MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्रं शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) मराठी भाषेचे पूरेसे ज्ञान आवश्यंक,<br>टंकलेखनाचे शासनमान्यं संस्थेचे प्रमाणपत्र (महाराष्ट्रं शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) 30 श.प्रं.मि.मराठी 40 श.प्रं.मि.इंग्रजी , न.प.सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेल विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यंक,अशी विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वंराज्यं संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यंक MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |
| 03 | ड्रायव्हर/फायरमन ऑपरेटर(श्रेणी-क) | किमान माध्यमिक शालात परिक्षा उत्तीर्ण शासनमान्यं संस्थेकडून फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यंक,जडवाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यंक, शारीरीक पात्रता (किमान)<br>1) उंची – 165 से.मी.<br>2) छाती – 81 से.मी.न फुगवता व फुगवून 86 से.मी.<br>3) वजन – 50 किलो<br>4) दृष्टी –चष्म्याशिवाय 5 / 5<br>-दर 5 वर्षांनी राज्यं अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांनी विहीत केलेला उजळणी पाठ्यक्रम / प्रशिक्षण (Refresher Course) पूर्ण करणे बंधनकारक. |

www.nmk.co.in

| | | |
|---|---|---|
| 04 | फायरमन | - किमान माध्यमिक शालांत परीक्षा (एसएससी) उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेकडून फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक,<br>जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक.<br>शारीरीक पात्रता (किमान)<br>1) उंची – 165 से.मी.<br>2) छाती – 81 से.मी.न फुगवता व फुगवून 86 से.मी.<br>3) वजन – 50 किलो<br>4) दृष्टी – चष्म्याशिवाय 5 / 5<br>दर 5 वर्षांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांनी विहीत केलेला उजळणी पाठ्यक्रम/प्रशिक्षण (Refresher Course) पूर्ण करणे MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |
| 05 | आरोग्य सहायक/नर्स (MPW/ANM) | शासनमान्य विद्यापीठाच्या विज्ञान शाखेचा जिवशास्त्र विषयातील पदवी आणी आरोग्य विषयातील पदविका (डी.पी.एच.) किंवा शासनाने विहित केलेला ए.एन.एम. कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक, मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक, MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) न.प.सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेल विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक, अशी विभागीय परिक्षा विहित केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक |
| 06 | तारतंत्री (श्रेणी-क) | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण व शासनमान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे 2 वर्षाचे बीजतंत्री (प्रथम श्रेणीत उत्तीर्ण) (महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले) असणे आवश्यक, मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक, MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) न.प.सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेल विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक,अशी विभागीय परिक्षा विहित केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक |
| 07 | गाळणी चालक/प्रयोगशाळा सहायक (श्रेणी-क) | शासनमान्य विद्यापीठाच्या विज्ञान शाखेचा रसायनशास्त्र विषयातील पदवीधर असणे आवश्यक,मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक, MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) न.प.सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेल विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक,अशी विभागीय परिक्षा विहित केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक |
| 08 | पंपचालक (श्रेणी क) | माध्यमीक शालांत परिक्षा उत्तीर्ण शासनमान्य औद्योगीक संस्थेचे दोन वर्षाचे विजतंत्री प्रमाणपत्र (प्रथम श्रेणीत उत्तीर्ण) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले |
| 09 | सहायक उद्यान पर्यवेक्षक (श्रेणी क) | शासन मान्य कृषी विद्यापीठाच्या उद्यान विद्या (हार्टीकल्चर) विषयाची पदवी असणे आवश्यक, मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक, MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) नगर |

www.mmk.co.in

| | | |
|---|---|---|
| | | परिषद सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहित केलेली विभागीयपरीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक अशी विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक |
| 11 | स्वच्छता निरिक्षक | शासनमान्य विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदविधर,स्वच्छता निरिक्षकाचा किंवा शासनमान्य संस्थेचे सार्वजनीक आरोग्य पदविका (डी पी एच ) असणे आवश्यक.मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>नगर परिषद सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहित केलेली विभागीयपरीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक अशी विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक |

**वयोमर्यादा:-**

सर्वसाधारणतः दिनांक 27/12/2106 रोजी उमेदवाराचे वय सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 25.04.2016 प्रमाणे वय वर्ष 18 पेक्षा कमी व 38 पेक्षा जास्त नसावे. शासन तरतुदीनुसार खालील समांतर आरक्षणाकरिता दर्शविल्याप्रमाणे उच्चवयोमर्यादेला शिथीलता प्रदान करण्यात आलेली आहे.

1) मागासवर्गीय उमेदवार 43 वर्ष

2) अपंग / प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त / स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य 45 वर्ष

3) पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवार 46 वर्ष

4) माजी सैनिक उमेदवार:- सशस्त्र दलात किमान 06 महिने केलेल्या माजी सैनिकामधील त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवाकाल +03 वर्ष एवढा काल त्यांच्या विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. अपंग माजी सैनिकासाठी वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत राहील.

5) खेळाडू 05 वर्षाची अट शिथील

6) 1991 चे जनगणना कर्मचारी व 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी:- कमाल वयोमर्यादा 45 वर्ष इतकी राहील या घटकातील मागासवर्गीय उमेदवारासाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्ष इतकीच राहील.

**परीक्षा शुल्क (फी) :-**

| | खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरीता | मागास प्रवर्गातील उमेदवाराकरीता |
|---|---|---|
| अ) सर्व उपरोक्त संवर्गासाठी | रु. 300/- | 150/-रु. |

उक्त परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ हैद्राबाद बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाव्दारे भरणे. स्टेट बँक ऑफ इंडियाकडून रुपये 40/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

www.nmk.co.in

टिप :-

1. अतिरिक्त संवर्ग,अंतरविभागीय समावेजन,विभागीय बदली व इतर विभागातील पदाचा आढावा किंवा न्यायालय/शासनाचे आदेश इत्यादी कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी,जास्त होणे) आरक्षण /समांतर आरक्षणामध्ये बदल होणेची शक्यता आहे.
2. नियुक्ती देणेयाचे नियमात ,पदसंख्येत /आरक्षणात बदल करणे,रद्द करणेचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवडसमिती तथा जिल्हाधिकारी जालना यांना राहतील.
3. शासनाने भरती बाबत /नियुक्ती बाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/आदेश इत्यादी लागु राहतील.
4. महिला/माजी सैनिक /अंशकालीन कर्मचारी या समांतर आरक्षणातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक प्रवर्गातुन समांतर आरक्षण विरहीत म्हणून भरले जातील.
5. भरतीच्या नियमामध्ये प्रक्रिया पुर्ण होई पावतो सुधारीत शासननिर्णय /परिपत्रकानुसार बदल होउ शकतो.
6. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.असंक/1025/प्र.क्र.21/भाग दिनांक 24.01.2006 अन्वये शासनाने विभागीय स्तरावर निर्माण केलेले अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे उमेदवार उपलब्ध झाल्यास त्याप्रमाणे पदे कमी होण्याची शक्यता आहे.
7. महिला व बालकल्याण विभागाचे शासन निर्णय क्र 82/2001/अशेआ-2000/प्रक्र415/का-2 दिनांक 25.05.2001 मधील तरतुदी नुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यात आलेले आहे.
8. समांतर आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीस लागू राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येणार नाही.
9. माजी सैनिक वगळता समांतर आरक्षणाचे पात्र उमेदवार न मिळाल्यास त्या-त्या प्रवर्गातील इतर उमेदवारांमधुन पदे भरण्यात येतील.

   शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, प्रानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ,दिनांक 27.06.2008 प्रानिमं-1214/प्र.क्र.(43/14)13-अ, दिनांक 05.06.2014 व प्रानिमं-1215/(प्र.क्र.55 /15)/13-अ, दिनांक 06.10.2015 व शासन, सामान्य प्रशासन विभागा कडील परिपत्रक क्र. एसआरव्ही-1097//प्र.क्र.31/98/16 अ दिनांक 16.03.1999 आणि शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक्र. एसआरव्ही 1012/प्र.क्र.16/12/16 -अ, दि. 13.08.2014 मधील तरतुदीनुसार अंतिम निवड करण्यात येईल.

## अर्ज करण्याची पध्दतः -

1. प्रस्तूत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.
2. सदर भरतीची जाहिरात www.jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

www.mmk.co.in

3. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (web based ) ऑनलाईन अर्ज www.jalna.nic.in या वेबसाईटव्दारे दिनांक 30.12.2016 ते दिनांक 11.01.2017 या कालावधीत भरणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज भरण्याच्याअंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

4. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना www.jalna.nic.in यावेबसाईटवर उपलब्ध आहेत. या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर परिक्षा शुल्क हे बँक चालानच्या स्वरुपात सदस्य सचिव जिल्हा निवड समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी जालना यांचे नावाने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कुठल्याही शाखेत चालान व्दारे खाते क्र. 33162911185 वर जमा करणे आवश्यक आहे. या बँकेत फी भरण्याचे चलन 03 प्रतीमध्ये उपलब्ध होईल. (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत) सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवारांने आवश्यकती फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहील. सदरच्या तीन प्रती पैकी उमेदवारास त्याची स्वतःची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया, बँकेकडून परत मिळेल त्यापैकी जिल्हा निवड समितीची प्रत, अशा उमेदवाराने कागदपत्र छाननीचे वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करावी. चलनाची मुळ प्रत परिक्षेच्या रोजी सोबत आणावी. बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक 30/12/2016 ते दि 13/01/2017 असा राहील. अंतिम दिनांका नंतर बँकेत परीक्षा शुल्क भरणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

5. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो व सही, स्वतःचा ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे तसेच स्वतःचा फोटो जिल्हा निवड समितीच्या सुचनेनुसार विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे तसेच उमेदवाराकडे फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र परीक्षेच्या दिवशी आणणे आवश्यक आहे. इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन घेणे व अर्ज करणे ही उमेदवाराची जबाबदारी राहील.

6. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर www.jalna.nic.in या संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाव्दारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही. त्यामुळे प्रवेशपत्र उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास प्रवेश परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.

8 महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने ( By Birth ) अर्ज करणे आवश्यक आहे.

## अटी व शर्ती :-

1. उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्र, अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही परंतु ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहील्यास अथवा चुकीची माहिती भरल्याने अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्ज भरताना खोटी माहिती भरल्याने

www.nmk.co.in

निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवार फसवणूकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. व गुणानुक्रमे गुणवत्ता यादीत आल्यास त्याचा दावा फेटाळण्यात येईल.

2. उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामूळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

   जाहिरातीत दर्शविलेल्या पदासाठी परिक्षा जालना जिल्ह्यातील कोणत्याही केंद्रावर घेण्यात येईल.

3. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्यांचेकडे असणे आवश्यक आहे. अर्जदार यांचेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय दिनांक 27 जून 2011 नुसार त्यांचेकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झालेबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.

4. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. मकसी-1007/प्रक्र.36/का/36 दि 10 जुलै 2008 नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील दावा केलेल्या 865 गावातील 15 वर्षांपासून रहिवाशी असल्याचा त्यांच्या वास्तव्यांचा सक्षम प्राधिका-यांचा विहीत नमुन्यातील दाखला लेखी परिक्षेनंतर गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या उमेदवारांना सादर करणे अनिवार्य आहे.

5. उक्त पदासाठी आवश्यक अर्हता धारणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल. उमेदवारांना कागदपत्र तपासणीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रे व त्यांच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास सदर उमेदवार भरती प्रक्रियेमधून बाद करण्यात येईल व नियुक्ती दिली जाणार नाही.

6. उक्त पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी परीक्षा केंद्राचे नाव, परीक्षार्थ्याचा सांकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक इत्यादी तपशील www.jalna.nic.in यासंकेतस्थळावर उपलब्ध होईल. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र www.jalna.nic.in यासंकेतस्थळावरुनप्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

7. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, जालना या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहित नमून्यात स्वतंत्रपणे विलसर ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

8. विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

9. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064 /2011/16-ब दिनांक 12/12/2011 नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडून पडताळणी करुन

www.mmk.co.in

घेणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

10. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8 ) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानूसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व विजाअ, भजब, भजक, भजड, विमाप्र व इमाव यांना लागू आहे. त्यानुसार उक्त प्रवर्गातील उमेदवारांनी शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी 10/2006/प्र.क्र.15 /मावक 5, दिनांक 30 जून, 2006 मधील सोबतच्या नमुन्यात वर्ष 2016-2017 ह्या (चालु वित्तिय वर्षाचे) कालावधीकरिता म्हणजे दिनांक 31/03/2017 पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र हे मुळ कागदपत्रांच्या छाननी वेळी सादर करणे बंधनकारक आहे. नॉन क्रिमीलेअरचे तत्व अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गाना लागू राहील.

11. उक्त नमूद पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणाऱ्या उमेदवारांना त्यांचे पदासाठी आवश्यक असणारे कागदपत्र पडताळणीच्या वेळी त्यांचे शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर) सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे लघुटंकलेखन, अनुभवप्रमाणपत्र व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दिनांक 1/7/2005 व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 नुसार विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन विवाहित/अविवाहित उमेदवारांनी सादर करणे अनिवार्य आहे.

12. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रशिक्षण 2000 /प्र.क्र.61 /2001/39 दिनांक19 मार्च 2003 नुसार गट क संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत शासनाने ठरवून दिलेली संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील.

13. शासन वित्त विभाग निर्णय क्र अनियो /10/05/126/सेवा 4 दिनांक 31/10/2005 नुसार दि. 1 नोव्हेंबर 2005 रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 व म. ना.से. (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

14. समांतर आरक्षणामधून अर्ज करणाऱ्या उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला

www.mmk.co.in

नाही. उमेदवार ज्या समांतर आरक्षणामधून अर्ज करीत असेल त्या समांतर आरक्षणाबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी जोडणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्राच्या आधारे उमेदवाराला संबंधित समांतर आरक्षणातील वयोमर्यादेतून सूट मिळणार आहे याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

15. उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

16. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली, म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे उमेदवारांनी समजू नये.

17. उमेदवारांना लेखी परिक्षा व कागदपत्र पडताळणीसाठी येण्या जाण्याचा खर्च स्वतः करावा लागेल.

18. जिल्हा निवड समितीने तयार केलेल्या अंतिम निवडसूची मधून गुणक्रमानुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसूचीतील ज्येष्ठतेनुसार / गुणानुक्रमानुसार ( संबंधीत प्रवर्ग/समांतर आरक्षणातील निवड यादीतील गुणानुक्रमानुसार / ज्येष्ठतेनुसार) उमेदवाराची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात येईल. प्रतिक्षा निवड यादीतील उमेदवार हे वरील नमूद कारणास्तव अंतिम निवड झालेला उमेदवार अपात्र ठरला तरच प्रतिक्षा निवड यादीमधील उमेदवाराची शिफारस करण्यात येईल. निवडसूची तयार करतांना विचारात घेतलेल्या रिक्त पदांच्या व्यतिरिक्त नंतर रिक्त झालेल्या पदांसाठी निवड सूचीतील उमेदवारांची शिफारस करण्यात येणार नाही. नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारांना स्वखर्चाने जाऊन हजर होणे अनिवार्य आहे.

19. शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दिनांक 27 जून, 2008 अन्वये जिल्हा निवड समितीने तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. अगर निवड यादीला एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच या आस्थापनेवरील वरील संवर्गातील नविन जाहिरात प्रसिध्द झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

20. अपंग संवर्गातील उमेदवाराकडे किमान अपंगत्वाचे प्रमाण 40 टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे विहीत प्रमाणपत्र असावे. अपंग उमेदवारास लेखी परिक्षेसाठी लेखनीक मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा. लेखनिकाची परिक्षेची शुल्क रक्कम रुपये 100/- ही चलनाव्दारे परिक्षा शुल्कामध्ये वाढ करून त्याप्रमाणे भरावी लागेल व ती नापरतावा राहील. ज्या उमेदवारांना लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळी लेखनिक पुरविला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवारांची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकीय मंडळाच्या प्रमाणपत्राच्या आधारे करण्यात येईल.

www.nmk.co.in

## समांतर आरक्षणातंर्गत असलेल्या कोटयासाठी अटी व शर्ती:-

अ) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारासाठी :-

अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक रक्रिधो-2002/प्रक्र68/क्रियुसे-2 दिनांक 30 एप्रिल 2005 मधील तरतूदीनुसार राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरीय शासन निर्णय परिशिष्ट अ मध्ये नमूद खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे असावे. व सदरचे मुळ प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

ब) अंशकालीन उमेदवारासाठी :-

अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये 03 वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

क) माजी सैनिक उमेदवारासाठी:-

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, डीस्चार्ज बुकाची मूळ प्रत व इतर आवश्यक कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

ड) भुकंपग्रस्त उमेदवारासाठी:-

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी (जिल्हाधिकारी) यांचे भुकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय
नोकरी मिळणेसाठी विहित केलेले प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

इ) प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी:-

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचे प्रकल्पग्रस्त असलेबाबचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

1. ई) महिला उमेदवारासाठी:-

१. मागासवर्गीय प्रवर्गातील विजाअ, भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इमाव तसेच खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. (फक्त अनु.जाती व अनु. जमाती वगळून)

२. मागासवर्गीय प्रवर्गातील विजाअ, भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इमाव तसेच खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांनी महिलांच्या 30 टक्के आरक्षणासाठी सक्षम प्राधिकारी यांचे दिनांक 31/03/2017 पर्यंत वैध असलेल्या नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्राची प्रत, मुळ कागदपत्रांच्या छाननी वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

www.mmk.co.in

## इतर महत्वाच्या सुचना :-

1. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रानिमं 2010/209/प्र.क्र.66/10/13-अ, दिनांक 19 जून, 2010 अन्वये उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळ्या शाईच्या बॉलपेनचा वापर करावा. अन्य कोणत्याही साधनाचा वापर केल्यास संबंधित उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
2. लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणीक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही. कागदपत्र पडताळणीसाठी उमेदवार गैरहजर राहील्यास उमेदवाराची निवड करण्यासाठी कोणताही विचार करण्यात येणार नाही.
3. परिक्षेमध्ये सहभाग नोंदविणा-या सर्व उमेदवारांना आवश्यक सुचना निवडसुची विषयी माहितीwww.jalna.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहतील.
4. लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेल्या गुणांची यादी www.jalna.nic.in या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल या गुणवत्ता यादीतून सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय अंतरिम गुणवत्ता यादी उक्त संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.
5. परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक 05/10/2015 नमुद निकषावर क्रम लावला जाईल
6. वरील गुणवत्ता यादीमधील गुणानुक्रमे पात्र व आरक्षण विचारात घेऊन कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र करण्यांत आलेल्या उमेदवारांनी संकेत स्थळावर दिलेल्या सूचनेनुसार त्यांनी कागदपत्रे छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास वेळेवर व ठरवून दिलेल्या मुळ कागदपत्रे साक्षांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी वेळेत उमेदवार कागदपत्रे छाननीसाठी अनुपस्थित राहिल्यास त्याच्या निवडीबाबत जिल्हा निवड समिती विचार करणार नाही व कागदपत्रे पडताळणीच्या दिनांकापासून सात दिवसाच्या नंतर गुणवत्तेप्रमाणे पुढील उमेदवाराचा नियुक्ती देण्याबाबतचा विचार करण्यांत येईल याबाबत गैरहजर उमेदवारास त्याच्या निवडीबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.
7. लेखी परिक्षा जालना जिल्ह्यातील परिक्षा केंद्रावर घेण्यात येईल.
8. नियुक्ती प्राधिकरणाचे मते नैतिक मुल्याचे अध:पतना सारख्या गुन्हया खाली उमेदवारावर दोष सिध्द झाला असल्यास सदर उमेदवार निवडीस पात्र असणार नाही.
9. वरील सर्व पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकुण गुणाच्या किमान 45 % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

## महत्वाची सुचना:-

उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करतांना सतत कार्यान्वीत असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल क्रमांक), ई-मेल आयडी व अद्ययावत पत्ता नमुद करावा जेणे करुन आपणास संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जाव्दारे नोंदविलेला भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी हा अपुर्ण अथवा चूकीचा असल्यास तसेच मोबाईल क्रमांक NCRP Registered (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच त्याव्दारे संदेशवहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना

www.nmk.co.in

अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी जालना हे जबाबदर असणार नाही. या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळाला (www.jalna.nic.in) भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत व टप्प्याबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

दिनांक :- 27/12/2016
स्थळ :- जालना.

अध्यक्ष जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी जालना.

www.nmk.co.in